पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ४६८ /२०१५
दिनांक : १२/०६/२०१५

प्रति,

मा.....................................
सदस्य, शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा दिनांक **१७/०६/२०१५** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **१७/०६/२०१५** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.शहर सुधारणा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – २१**

दिनांक : **१७/०६/२०१५** वेळ : दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **१७/०६/२०१५** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

---------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या महाराष्ट्र शासन, नवनगर विकास विभाग अधिसुचना क्र.पीएस-१८९३/१४१२/युडी-१३, दिनांक २८ नोव्हेंबर १९९५ अन्वये मंजूर विकास आराखडयात तथापि महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग अधिसुचना क्र.पीसीएन-१६९७/९३४/प्र.क्र.८९/नवि-२२, मंत्रालय, मुंबई, दिनांक १५ नोव्हेंबर १९९७ अन्वये मंजूर विकास आराखडयात मौजे भोसरी येथील स.नं.१५ पै. व स.नं.१४ पै. मधील २४.० मी. रुंद रस्ता व १२.० मी. रस्ता प्रस्तावित आहे. मौजे भोसरी येथील नागरिकांची दळणवळणाची गैरसोय होत असल्याने व वाहतुकीच्यादृष्टीने स.नं.१५ पै. व १४ पै.मिळकतीमधील मंजूर विकास योजनेतील २४.० मी. (स.नं.१५ पै.) व १२.० मी. (स.नं.१४ पै.) रुंद रस्ता विकसित करणे आवश्यक आहे. रस्त्याने बाधित क्षेत्र हे खाजगी मिळकतधारकाचे असल्याने भूसंपादन करणे आवश्यक असल्याने " पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण मंजूर विकास योजनेतील मौजे भोसरी येथील दक्षिणोत्तर १२.० मी. रुंद रस्त्यापासून ते एम.आय.डी.सी.हद्दीपर्यंत स.नं.१५ पै. व १४ पै. मधील २४ व १२ मी. रुंद (पुर्व-पश्चिम) रस्त्याचे क्षेत्र भूसंपादन अधिनियमान्वये संपादन करणेकामी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरीता व सदर भूसंपादनास येणा-या खर्चास मान्यता देणेस व खर्च रक्कम अदा करणेकामी मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२) भूसंपादन, पुणे सामाजिक परिणाम निर्धारण अहवालाचे मुल्यमापन करण्यासाठी विविध शाखेतील तज्ञ गट स्थापन करणेबाबत –

संदर्भ १) मा.उप सचिव, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.संकीर्ण ०१/२०१५/प्र.क्र.२/अ-२, दि. २३/०१/२०१५ व २) मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचे पत्र क्र. पीएलसी/ कावि/८०/२०१५, दि.१०/०२/२०१५ अन्वये उपरोक्त संदर्भीय पत्र क्र.१ नुसार नवीन भूसंपादन नियमावलीतील " नियम ७ (ख)" नुसार राज्य शासन सामाजिक परिणाम निर्धारण अहवालाचे मुल्यमापन करण्याकरिता विविध शाखेतील तज्ञगटाची नेमणूक करणा-या तज्ञ गटामध्ये

ज्यांना सामाजिक परिणाम निर्धारण प्रक्रियेमध्ये प्रतिनिधीत्व देण्यात आलेले नसेल अशा ग्रामसभेच्या, पंचायतीच्या, नगरपरिषदेच्या अथवा महानगरपालिकेच्या सदस्यांमधून दोन प्रतिनिधी या पैकी किमान एक महिला प्रतिनिधी असेल अशी २ नावे शासनास तात्काळ सादर करण्यात यावीत जेणेकरून शासनस्तरावर त्यांचे पॅनल तयार करता येईल असे मा.उप सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी मा.विभागीय आयुक्त व मा.जिल्हाधिकारी यांना कळविले आहे. सदरचे पत्रास अनुसरुन संदर्भ क्र.२ अन्वये “ उक्त विषयाबाबत संदर्भिय पत्रान्वये दिलेल्या सुचनेप्रमाणे नियम ७(ख) नुसार दोन व्यक्तींची नावे तात्काळ या कार्यालयास कळवावीत म्हणजे सदरचा अहवाल मे.शासनास सादर करता येईल.” असे मा.जिल्हाधिकारी पुणे यांनी मनपाला कळविले आहे. नवीन भूसंपादन नियमावलीतील नियम ७(ख) नुसार दोन व्यक्तींची नावे ठरवून मा.जिल्हाधिकारी यांचे कार्यालयास कळविण्यासाठी मा.महापालिका सभेची मान्यता आवश्यक असल्याने मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे

----------



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४६८/२०१५
दिनांक : १२/०६/२०१५ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.